| **Headline:** Domestic investors are now active in the market | |
|---|---|
| **Source:** Maharashtra Times | **Date:** 17 July 2017 |

# देशी गुंतवणूकदार बाजारात सक्रिय



**गेल्या काही दिवसांपासून भांडवल बाजार सातत्याने वर जात आहेत. यामध्ये देशी गुंतवणूकदारांचा सहभाग सक्रिय असल्याचे दिसते. या पार्श्वभूमीवर राष्ट्रीय शेअर बाजाराचे नवे सीईओ व एमडी विक्रम लिमये यांनी 'मटा'शी केलेली खास बातचीत.**

**भांडवल बाजार सातत्याने सुधारतो आहे. अर्थव्यवस्थेची स्थिती मोजण्यासाठी भांडवल बाजार आधार ठरतो का?**

खरं म्हणजे, अर्थव्यवस्थेचं प्रतिबिंब म्हणून बाजाराकडे पाहिलं गेलं पाहिजे. परंतु तसं होत नाही. आताची बाजाराची स्थिती पाहिलीत, तर अर्थव्यवस्थेची वाढ तितकीशी चांगल्या प्रकारे, लोकांच्या अपेक्षेनुसार झालेली दिसणार नाही. तसंच बाजारात कंपन्यांच्या शेअर्सना जो भाव मिळतो आहे त्या तुलनेत कंपन्यांच्या उत्पन्नात, मिळकतीत सुधारणा झालेली दिसत नाही. तरीही भारतीय अर्थव्यवस्था ही जगातल्या अन्य अर्थव्यवस्थांच्या मानाने खूपच सुस्थितीत आहे. चीन, युरोप, जपान आणि अमेरिका यांच्या तुलनेत भारतीय अर्थव्यवस्था चांगल्या स्थितीत आहे, असंच म्हणावं लागेल.

**भांडवल बाजारातील या तेजीमागची कारणं कोणती?**

जगभरात लिक्विडीटी वा भांडवल पर्याप्तता वाढली की ती गुंतवण्याचे मार्ग शोधले जातात. सध्या भारतीय भांडवल बाजार हा सर्वांच्याच पसंतीचा मार्ग बनला आहे. त्यामुळे परदेशी भांडवलाचा ओघ वाढतो आहे. त्यातही गेल्या दीडेक वर्षात देशी गुंतवणूकदारांकडून मोठ्या प्रमाणावर भांडवल बाजारात पैसा गुंतवला जात आहे. आधी योग्य काळ पाहून भांडवल बाजारात गुंतवणूक केली जायची. परंतु आता एसआयपीच्या माध्यमातून बव्हंशी गुंतवणूक होत असल्याने वेळ पाहिली जात नाही. एसआयपीचा ओघ दरमहा सुमारे पाच हजार कोटी रुपये बाजारात येत आहेत. ही चांगली गोष्ट आहे. त्यामुळे बाजार हा केवळ आर्थिक मूल्यांचं प्रतिबिंब दाखवत नाहीये, तर लिक्विडीटी सक्षम असल्यामुळे व देशी गुंतवणूकदारांकडून प्रचंड प्रमाणावर पैसा येत असल्यामुळे बाजार उत्तरोत्तर मजबूत होतो आहे.

**भावी काळातलं भांडवल बाजाराचं चित्र कसं असेल?**

भांडवल बाजार सकारात्मक वाटचाल करत राहील, असं ठामपणे सांगण्यासाठी काही कारणं आहेत - स्थूल आर्थिक स्थिरता देशात आहे, राजकीय स्थैर्य आहे, धोरणे स्थिर आहेत, संरचनात्मक सुधारणा होत आहेत. या कारणांमुळे बाजार वरच्या दिशेने वाटचाल करत राहील. रिटेल गुंतवणूकदारांसाठी म्युच्युअल फंडांच्या माध्यमातून पुढील काळातही गुंतवणुकीसाठी मोठा वाव असेल.

**अर्थव्यवस्थेत वेगवेगळ्या प्रकारचे व्यवहार होत असतात. मग केवळ शेअर बाजार पुरेसे आहेत का?**

मुळीच नाही. मुंबई, राष्ट्रीय यासारखे शेअर बाजार हे इक्विटी मार्केट म्हणून ओळखले जातात. याशिवाय

**टॉक टाइम**

आपल्याकडे अनेक प्रकारचे मार्केट विकसित होणं गरजेचं आहे. देशात अजून बाँड मार्केट विकसित झालेलं नाही. इंटरेस्ट रेट फ्युचर्स मार्केट, क्रेडिट डेरिव्हेटिव्ह मार्केट विकसित होणं आवश्यक आहे. कृषी व धातूप्रमाणेच अन्य वस्तूंसाठी कमॉडिटी मार्केटही विकसित होणं गरजेचं आहे. मार्केट विकसित करणं हे भांडवलाचे प्रभावी वाटप करण्यासाठी महत्त्वाचं आहे. तरच मुदत ठेवींमध्ये गुंतवला जाणारा पैसा या बाजारांतून खेळवला जाईल.

**अर्थव्यवथेची पुढील वाटचाल कशी वाटते?**

सध्या आपण सरकारी गुंतवणूक व वापर या दोन इंजिनांवर अर्थव्यवस्थेचा गाडा चालवतो आहोत. परंतु आता खासगी गुंतवणूक वाढणे व ग्रामीण भागातून मागणी वाढणे आवश्यक आहे. ६ - ६.५ टक्के जीडीपी पुरेसा नाही. मोठ्या प्रमाणावर बेकारी आहे. आता आयटी - बीपीओ, वित्तसेवा, दूरसंचार, पायाभूत सुविधा, घरबांधणी या हमखास रोजगार देणाऱ्या क्षेत्रांवर रोजगारनिर्मितीसाठी अवलंबून राहता येणार नाही. दरडोई उत्पन्न, जीवनशैली याचा विचार व्हावा. गुणवत्तेचं चीज करणारे रोजगार हवेत. त्यामुळे ८ - ८.५ टक्के जीडीपी आपल्याला हवाच आहे.

**(मुलाखत : वैभव वझे)**